आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## (गोषवारा)

दि. 3/4/2023

विषय 01 मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दिनांक 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने मध्ये (NPS) समाविष्ट करणेबाबत.

दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना दि.31/10/2005 रोजीच्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेत योजना (DCPS) लागू केली आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या अंदाजे 644 अधिकारी/कर्मचारी यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे.

दि.22/02/2022 रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकांमध्ये दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करण्यात आली आहे.

तसेच दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी यांच्या वेतनातून त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या 10% दराने कर्मचारी अंशदान कपात करावे आणि नियोक्त्याचे अंशदान 10% देण्यात यावे. शासन निर्णय वित्त विभाग दि.19/08/2019 नुसार दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14% ने भरण्यात यावे असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी यांच्या वेतनातून त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या 10% दराने कर्मचारी अंशदान आणि नियोक्त्याचे अंशदान 10% टक्के दराने करण्यात येते. त्यामुळे दि.22/02/2022 रोजीच्या शासन निर्णयानुसार दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14 % ने भरणे आवश्यक आहे.

सबब दि.22/02/2022 रोजीच्या शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या कर्मचारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने मध्ये (NPS) समाविष्ट करणे बाबत व दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14 % ने भरणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शिफारस आहे.

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

(मा.आयुक्त यांचे मान्यतेने)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय सभा दि.03/04 /2023

प्रकरण क्र. :- 09 मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दिनांक 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने मध्ये (NPS) समाविष्ट करणेबाबत.

## कार्यालयीन प्रस्ताव

दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना दि.31/10/2005 रोजीच्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेत योजना (DCPS) लागू केली आहे. त्यानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेत दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या अंदाजे 644 अधिकारी/कर्मचारी यांना परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू करण्यात आली आहे.

दि.22/02/2022 रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकांमध्ये दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (NPS) लागू करण्यात आली आहे.

तसेच दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी यांच्या वेतनातून त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या 10% दराने कर्मचारी अंशदान कपात करावे आणि नियोक्त्याचे अंशदान 10% देण्यात यावे. शासन निर्णय वित्त विभाग दि.19/08/2019 नुसार दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14% ने भरण्यात यावे असे निर्देश देण्यात आलेले आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी इत्यादी यांच्या वेतनातून त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून मूळ वेतन अधिक महागाई वेतन (असल्यास) अधिक महागाई भत्ता या रकमेच्या 10% दराने कर्मचारी अंशदान आणि नियोक्त्याचे अंशदान 10% टक्के दराने करण्यात येते. त्यामुळे दि.22/02/2022 रोजीच्या शासन निर्णयानुसार दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14 % ने भरणे आवश्यक आहे.

सबब दि.22/02/2022 रोजीच्या शासन निर्णयानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेतील दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या कर्मचारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने मध्ये (NPS) समाविष्ट करणे बाबत व दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14 % ने भरणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजुरी मिळावी, असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. 09 दिनांक 03/04/2023**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेत दिनांक 01 नोव्हेंबर 2005 रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने मध्ये (NPS) समाविष्ट करणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क.71(भाग-2)/नवि-14, दि.27/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन "मिरा भाईंदर महानगरपालिकेतील दि.01/11/2005 रोजी व त्यानंतर नियमित शासन मान्य पदावर विहित पद्धतीने नियुक्त झालेल्या कर्मचारी, अधिकारी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना लागू असलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने मध्ये (NPS) समाविष्ट करणेबाबत व दि.01/04/2019 पासून नियोक्त्याचे अंशदान 14 % ने भरणेबाबत आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे."

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- आस्थापना विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीकरीता सादर.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दि.०३/०४/२०२३

### // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( ०२ ) अग्निशमन विभागाकरिता वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करणेबाबत.

**संदर्भ** :- १) मिभा/मनपा/अग्नि/८४१/२०२२-२३ दि. ०८/०९/२०२२ रोजीचा अहवाल.
२) प्रशासकीय ठराव दिनांक १३/१०/२०२२ ठारव क्र. ६०.
३) मिभा/मनपा/अग्नि/१६६९/२०२२-२३ दि. १८/०१/२०२३ रोजीचा अहवाल.
४) मिभा/मनपा/अग्नि/१९९८/२०२२-२३ दि. ०१/०३/२०२३ रोजीचा तांत्रिक लिफाफा उघडणेबाबत ई-टेंडरींग कक्षास पत्र.
५) मिभा/मनपा/अग्नि/२१००/२०२२-२३ दि. १४/०३/२०२३ रोजीचा तांत्रिक छाननी अहवाल.
६) मिभा/मनपा/अग्नि/२१००/२०२२-२३ दि. १५/०३/२०२३ रोजीचे दरपत्रके उघडणेबाबतचे ई-टेंडरींग कक्षास पत्र.
७) मिभा/मनपा/अग्नि/२१२१/२०२२-२३ दि. २०/०३/२०२३ रोजीचे दरपत्रके निश्चित करणेबाबतच्या बैठकीबाबत पत्र.
८) मिभा/मनपा/अग्नि/२१२२/२०२२-२३ दि. २०/०३/२०२३ रोजीचे वाटाघाटीस उपस्थित राहणेबाबत पत्र.

अग्निशमन विभागाकरिता वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करणेकामी निविदा क्र. 2023_MBMC_869796_1 ही निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेत ०३ निविदाधारकानी भाग घेतला आहे. १) **मे. अक्षर फायर सेफ्टी** २) **मे. सेनोस्फेअर इंडिया प्रा. लि. व ३) मे. जिम्प्लेक्स प्रा. लि.** हे तीनही निविदाधारक तांत्रिक लिफाफा चाचणीत पात्र ठरले असल्याने त्यांचे दरपत्रके उघडण्यात आली व सदर दरपत्रके निश्चिती करिता दि. २१/०३/२०२३ राजीच्य निविदा समितीच्या बैठकी समोर मांडण्यात आली. सदर दरपत्रकांपैकी मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. ठेकंदाराने सादर केलेले दर हे सर्वात कमी असल्याने त्यांना दि. २१/०३/२०२३ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकीत वाटाघाटी करिता निमंत्रित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा. निविदा समिती व मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. यांच्यामधील झालेल्या बैठकीत वाटाघाटी अंती मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. या ठेकेदारानी सादर केलेले सुधारीत दर पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | | मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. | | वाटाघाटी अंती दर (०.५०% कमी दराने) |
|---|---|---|---|---|---|
| १) | | नग | दर प्रती नग | एकूण रक्कम | एकूण रक्कम |
| | Supply of Bike as per the specifications of FIRE AND EMERGENCY SERVICES | 16 Nos. | 1,14,357 | 18,29,712 | **18,20,563/-** |
| | Fabrication of Fire Bike as per the specifications of FIRE AND EMERGENCY SERVICES | 16 Nos. | 14,95,642 | 2,39,30,272 | **2,38,10,621/-** |
| | **TOTAL** | | | **2,57,59,984** | **2,56,31,184/-** |
| | **GST** | | | **48,19,776** | **46,13,613/-** |
| | **Grand Total** | | | **3,05,79,760** | **3,02,44,797/-** |

वरिल प्रमाणे मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. यांनी सादर केलेले सुधारीत दरानुसार अग्निशमन विभागाकरिता एकुण १६ नग वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करिता एकुण खर्च रु. ३,०२,४४,७९७/- (सर्व करासहित) इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक "नवीन फायर फायटर खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३५००.०० लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे.

तरी अग्निशमन विभागाकरिता एकुण १६ नग वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करिता लेखाशिर्षक "नवीन फायर फायटर खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३,०२,४४,७९७/- (सर्व करासहित) या खर्चास तसेच ठेकेदारासह करारनामा करणे व कार्यादेश प्रदान करणेस मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## अग्निशमन विभाग

### प्रशासकीय ठराव दि.०३/०४/२०२३ रोजी.प्राये.४.००वाजता

**प्रकरण क्रमांक ( ०२ )** अग्निशमन विभागाकरिता वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करणेबाबत

**कार्यालयीन प्रस्ताव**

**संदर्भ :-** १) मिभा/मनपा/अग्नि/८४१/२०२२-२३ दि. ०८/०९/२०२२ रोजीचा अहवाल.

२) प्रशासकीय ठराव दिनांक १३/१०/२०२२ ठारव क्र. ६०.

३) मिभा/मनपा/अग्नि/१६६९/२०२२-२३ दि. १८/०१/२०२३ रोजीचा अहवाल.

४) मिभा/मनपा/अग्नि/१९९८/२०२२-२३ दि. ०१/०३/२०२३ रोजीचा तांत्रिक लिफाफा उघडणेबाबत ई-टेंडरींग कक्षास पत्र.

५) मिभा/मनपा/अग्नि/२१००/२०२२-२३ दि. १४/०३/२०२३ रोजीचा तांत्रिक छाननी अहवाल.

६) मिभा/मनपा/अग्नि/२१००/२०२२-२३ दि. १५/०३/२०२३ रोजीचे दरपत्रके उघडणेबाबतचे ई-टेंडरींग कक्षास पत्र.

७) मिभा/मनपा/अग्नि/२१२१/२०२२-२३ दि. २०/०३/२०२३ रोजीचे दरपत्रके निश्चित करणेबाबतच्या बैठकीबाबत पत्र.

८) मिभा/मनपा/अग्नि/२१२२/२०२२-२३ दि. २०/०३/२०२३ रोजीचे वाटाघाटीस उपस्थित राहणेबाबत पत्र.

अग्निशमन विभागाकरिता वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करणेकामी निविदा क्र. 2023_MBMC_ 869796_1 ही निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा प्रक्रियेत ०३ निविदाधारकानी भाग घेतला आहे. १) **मे. अक्षर फायर सेफ्टी** २) **मे. सेनोस्फेअर इंडिया प्रा. लि.** व ३) **मे. जिम्प्लेक्स प्रा. लि.** हे तीनही निविदाधारक तांत्रिक लिफाफा चाचणीत पात्र ठरले असल्याने त्यांचे दरपत्रके उघडण्यात आली व सदर दरपत्रके निश्चिती करिता दि. २१/०३/२०२३ राजीच्य निविदा समितीच्या बैठकी समोर मांडण्यात आली. सदर दरपत्रकांपैकी मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. ठेकंदाराने सादर केलेले दर हे सर्वात कमी असल्याने त्यांना दि. २१/०३/२०२३ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकीत वाटाघाटी करिता निमंत्रित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मा. निविदा समिती व मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. यांच्यामधील झालेल्या बैठकीत वाटाघाटी अंती मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. या ठेकेदारानी सादर केलेले सुधारीत दर पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | तपशील | | मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. | | वाटाघाटी अंती दर (०.५०% कमी दराने) |
|---|---|---|---|---|---|
| १) | | नग | दर प्रती नग | एकूण रक्कम | एकूण रक्कम |
| | Supply of Bike as per the specifications of FIRE AND EMERGENCY SERVICES | 16 Nos. | 1,14,357 | 18,29,712 | **18,20,563/-** |
| | Fabrication of Fire Bike as per the specifications of FIRE AND EMERGENCY SERVICES | 16 Nos. | 14,95,642 | 2,39,30,272 | **2,38,10,621/-** |
| | **TOTAL** | | | **2,57,59,984** | **2,56,31,184/-** |
| | **GST** | | | **48,19,776** | **46,13,613/-** |
| | **Grand Total** | | | **3,05,79,760** | **3,02,44,797/-** |

वरिल प्रमाणे मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. यांनी सादर केलेले सुधारीत दरानुसार अग्निशमन विभागाकरिता एकुण १६ नग वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करिता एकुण खर्च रु. ३,०२,४४,७९७/- (सर्व करासहित) इतका खर्च अपेक्षित आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक "नवीन फायर फायटर खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत रु. ३५००.०० लाख एवढी तरतूद करण्यात आली आहे.

तरी अग्निशमन विभागाकरिता एकुण १६ नग वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करिता लेखाशिर्षक "नवीन फायर फायटर खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत रु. रु. ३,०२,४४,७९७/- (सर्व करासहित) या खर्चास मा. सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळणेस मिळणेस कार्यालयीन प्रस्ताव प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेला आहे.

**सर्वसाधारण सभा प्रशासकीय ठराव क्र.** ०२ **दि.** ०३/ ०४/२०२३.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकरिता एकुण १६ नग वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करणेबाबतच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ २०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४ दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या अधिकाराचा वापर करुन, प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन अग्निशमन विभाग प्रस्तावीत करित असलेल्या एकुण १६ नग वॉटर मिस्ट (दुचाकी) वाहने खरेदी करणेच्या कामाकरिता मे. जिम्प्लेक्स प्रा. लि. यांनी वाटाघाटी अंती सादर केलेल्या दराची निविदा स्विकारण्यात येत असुन सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय तरतुदींपैकी लेखाशिर्ष "नवीन फायर फायटर खरेदी" या लेखाशिर्षात अंतर्गत रु. ३,०२,४४,७९७/- (सर्व करासहित) **(अक्षरी रुपये तीन कोटी दोन लाख चौव्वेचाळीस हजार सातशे सत्त्याण्णव)** या खर्चास तसेच ठेकदारासह करारनामा करुन कार्यादेश प्रदान करणेस वित्तीय व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

पुढिल आवश्यक कार्यवाही मियमानुसार संबंधीत विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक**
**मिरा भाईंदर**
**महानगरपालिका**

**प्रत :- अग्निशमन विभागाकडे योग्य त्या कार्यवाही करिता सादर**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**उद्यान विभाग**

मा. प्रशासकीय सभा दि. ०३/०४/२०२३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.:- ०३** **घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणेकामी ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेबाबत**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जे.पी. इंन्फ्रा येथील रस्त्यावरील दुभाजकामध्ये नव्याने उद्यान विकसीत करण्यात येणार असुन सदर उद्यानातील झाडांना दैनंदिन पाणी पुरवठा करणेकामी भुमीगत पाण्याची टाकी व पंप रुम बांधणे करीता घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि. ०३/०२/२०२३ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार दि.२०/०२/२०२३ रोजीच्या जाहीर सुचना दै. सागर, सा. लक्ष्यधारी या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दि.२३/०२/२०२३ ते दि.०२/०३/२०२३ या कालावधीत ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने जाहिर सुचना मागविण्यात आली.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि. ०६/०३/२०२३ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०२ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.१५/०३/२०२३ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.१६/०३/२०२३ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०२ निविदांची Financial Bid दि.२०/०३/२०२३ रोजी उघडण्यात आली त्यानुसार मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांची कमी दराची (L१) निविदा प्राप्त झालेली आहे. त्यानुसार कमी दराचे निविदाधारक (L१) मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांच्या दरामध्ये वाटाघाटी करण्यात आलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळुन) | निविदाधारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणे | रु.३९,२०,५१३/- | **१) मे. मुस्कान इंटरप्रायजेस** | अंदाजपत्रकीय दराने **दर वाटाघाटीनंतर (२% कमी दराने)** |
| | | | २) मे. राठोड ब्रदर्स | ८.००% जास्त दराने |

वरील नमुद कामाकरिता मे. मुस्कान इंटरप्रासजेस यांनी निविदेत भरलेल्या दरामध्ये उपरोक्त प्रमाणे दर वाटाघाटी केलेली आहे. तरी वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. निविदा समीतीने दि.२७/०३/२०२३ रोजी शिफारस केलेली असून मा. आयुक्त सो. यांनी दि. २८ / ०३ /२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, सदर कामाची मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांची कमी दराची वाटाघाटीअंतीची निविदा मंजुर करुन त्यांच्या सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा. प्रशासक यांची मान्यता मिळणेस शिफारस असे.

**(संजय शिंदे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान विभाग

**मा. प्रशासकीय ठराव दि. ०३/०४/२०२३ रोजी ३.०० वाजता.**

**प्रकरण क्र. ०३ :- घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणेकामी ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आलेल्या निविदेबाबत.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जे.पी. इंन्फ्रा येथील रस्त्यावरील दुभाजकामध्ये नव्याने उद्यान विकसीत करण्यात येणार असुन सदर उद्यानातील झाडांना दैनंदिन पाणी पुरवठा करणेकामी भुमीगत पाण्याची टाकी व पंप रुम बांधणे करीता घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणेकामी मा. आयुक्त सो. यांनी दि. ०३/०२/२०२३ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार दि.२०/०२/२०२३ रोजीच्या जाहीर सुचना दै. सागर, सा. लक्ष्यधारी या वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दि.२३/०२/२०२३ ते दि.०२/०३/२०२३ या कालावधीत ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने जाहिर सुचना मागविण्यात आली.

सदर कालावधीमध्ये प्राप्त ०४ निविदाधारकांची Technical Bid दि. ०६/०३/२०२३ रोजी उघडण्यात आले असता प्राप्त ०४ निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी मा. निविदा समिती समोर करुन पात्र ०२ निविदाधारकांची Financial Bid उघडण्यास दि.१५/०३/२०२३ रोजी मा. निविदा समितीने शिफारस करुन दि.१६/०३/२०२३ रोजी मा.आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पात्र ०२ निविदांची Financial Bid दि.२०/०३/२०२३ रोजी उघडण्यात आली त्यानुसार मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांची कमी दराची (L१) निविदा प्राप्त झालेली आहे. त्यानुसार कमी दराचे निविदाधारक (L१) मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांच्या दरामध्ये वाटाघाटी करण्यात आलेली असुन त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम (GST वगळुन) | निविदाधारकाचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|
| 1 | घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणे | रु.३९,२०,५१३/- | **१) मे. मुस्कान इंटरप्रायजेस** | अंदाजपत्रकीय दराने **दर वाटाघाटीनंतर (२% कमी दराने)** |
| | | | २) मे. राठोड ब्रदर्स | ८.००% जास्त दराने |

वरील नमुद कामाकरिता मे. मुस्कान इंटरप्रासजेस यांनी निविदेत भरलेल्या दरामध्ये उपरोक्त प्रमाणे दर वाटाघाटी केलेली आहे. तरी वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची निविदा स्विकारण्यास मा. निविदा समीतीने दि.२७/०३/२०२३ रोजी शिफारस केलेली असून मा. आयुक्त सो. यांनी दि. २८/०३/२०२३ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सबब, सदर कामाची मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास मा. प्रशासक यांची मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ०३ दि. ०३ / ०४ /२०२३**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणेकामी मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. त्याच प्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ च्या शासन निर्णयानुसार रु.१.०० कोटी रक्कमेच्या कामासाठी Similar Work कामाच्या अनुभवाची अट टाकण्यात येऊ नये.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका स्थायी समिती सभेचा अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथील ६० मीटर विकास योजना रस्त्यामधील (जे.पी. इंन्फ्रा जवळ) दुभाजकामध्ये भुमीगत पाण्याची टाकी व पंपरुम बांधणेकामी मे. मुस्कान इंटरप्रायजेस यांची वाटाघाटीअंती कमी दराची निविदा मंजुर करुन त्यांचा सोबत करारनामा करुन कार्यादेश देण्यास व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे. पारीत ठरावानुसार उद्यान विभागाने नियमानुसार कार्यवाही करावी.

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीय सभा दि. ०३।०४।२०२३

### // गोषवारा //

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार विभागाकडे उपलब्ध असलेले सी. सी. टी. व्ही. व यंत्रणा कार्यान्वित करणे.**

**संदर्भ : १) जा. क्र. मनपा/आ.व्य./२६९/२०२२-२३, दि.०८/१२/२०२२ अन्वये निविदा सूचना**
**२) जा. क्र. मनपा/आ.व्य./२७३/२०२२-२३, दि.१२/१२/२०२२ अन्वये शुद्धीपत्रक**
**३) मा. आयुक्त सो. यांची तांत्रिक छाननी मान्यता दि. ०१/०२/२०२३**
**४) मा. आयुक्त यांची दि. रोजीची निविदेस मान्यता**

**प्रकरण क्र. : ( ०४ )**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार विभागाकडे उपलब्ध असलेले सी. सी. टी. व्ही. व यंत्रणा कार्यान्वित करणे कामी दि. ०८/१२/२०२२ रोजी संदर्भिय निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडला असता खालीलप्रमाणे निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रूटी असल्याने मे. न्यू फील्ड, मे. युटीलिटी एंटरप्रायजेस व मे. ए. वी. सोल्यूशन यांना कागदपत्रे सादर करणेकरीता दि. २३/०१/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि मे. ए. वी. सोल्यूशन यांनी कोणतीही कागदपत्रे व लेखी म्हणणे सादर न केल्याने निविदेमध्ये सादर केलेली कागदपत्रे अंतिम मानून व इतर दोन निविदाकारांनी विभागामध्ये मुदतीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांनुसार पात्र निविदाधारक मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा.लि., मे. रमेश इलेक्ट्रिकल, मे. न्यू फील्ड व मे. युटीलिटी एंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा उघडणेकरीता मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

निविदेचा तांत्रिक छाननी अहवाल संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेपासून कोणत्याही निविदाधारकाने हरकत नोंदविली नसल्याने पात्र निविदाधारकांचा दराचा लिफाफा दि. ०३/०२/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता उघडण्यात आला. त्यानुसार प्राप्त दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजपत्रकीय दर | निविदा धारकांचा तपशिल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा.लि. | मे. न्यू फील्ड | मे. रमेश इलेक्ट्रिकल | मे. युटीलिटी एंटरप्रायजेस |
| ०१ | Item No1 Camera installation charges per camera(MR) | रू. १६००/- | रू. १६००/- | रू. ११५०/- | रू. १९७०/- | रू. १८५०/- |
| ०२ | Item no.2 Supplying and installing cat-6 STP cable suitable for networking complete as per specification.. DSR 1-10-5 | रू. ९६/- | रू. ९६/- | रू. ८०/- | रू. १०४/- | रू. ९८/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | Item no.3 Supplying and erecting mains with 3x2.5 sq.mm FRLSH copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW. DSR 1-3-6 | रू. ९३/- | रू. ९३/- | रू. ७८/- | रू. १०२/- | रू. ९५/- |
| ०४ | Item No. 4 Supplying and erecting HMS PVC conduit FRLS grade 25 mm dia. With necessary accessories in wall/floor with chiselling appropriately as per specification No: WG-MA/CC. DSR 1-1-9 | रू. १२७/- | रू. १२७/- | रू. ९९/- | रू. १३९/- | रू. ११३/- |
| | **Part B: Maintenance** | | | | | |
| ०५ | Comprehensive Maintenance for Second Year | -- | १०% | ९% | १४% | १२% |
| ०६ | Comprehensive Maintenance for Third Year | -- | १५% | १४% | २२% | १९% |
| ०७ | Comprehensive Maintenance for Fourth Year | -- | २०% | १९% | ३०% | २६% |
| | शेरा | | L-2 | L-1 | L-4 | L-3 |

वरीलप्रमाणे तक्ता पाहता मे. न्यू फिल्ड यांनी सर्वात कमी दर सादर केलेले असून बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने प्रशासकीय ठराव करून निविदाकार मे. न्यू फिल्ड यांनी सादर केलेल्या दरांचे अवलोकन करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि -१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम ४५२ अ चा (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त अधिकारात वरील नमुद प्रस्तावाचे अवलोकन करणेस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि. 29/3/2023 व.क्र. 2492
मा. प्रशासकीय ठराव गोषवार नोंद 384
रजिस्टर अ. क्र ....... वर्ष :- 2022/23

(संजय शिंदे)
उप-आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. प्रशासकीय सभा दि. 03/04/2023

## // ठराव //

**विषयक्र ( 04 ) :**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार विभागाकडे उपलब्ध असलेले सी. सी. टी. व्ही. व यंत्रणा कार्यान्वित करणे.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार विभागाकडे उपलब्ध असलेले सी. सी. टी. व्ही. व यंत्रणा कार्यान्वित करणे कामी दि. ०८/१२/२०२२ रोजी संदर्भिय निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार निविदेचा तांत्रिक लिफाफा उघडला असता खालीलप्रमाणे निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याने मे. न्यू फील्ड, मे. युटीलिटी एंटरप्रायजेस व मे. ए. वी. सोल्यूशन यांना कागदपत्रे सादर करणेकरीता दि. २३/०१/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि मे. ए. वी. सोल्यूशन यांनी कोणतीही कागदपत्रे व लेखी म्हणणे सादर न केल्याने निविदेमध्ये सादर केलेली कागदपत्रे अंतिम मानून व इतर दोन निविदाकारांनी विभागामध्ये मुदतीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांनुसार पात्र निविदाधारक मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा.लि., मे. रमेश इलेक्ट्रिकल, मे. न्यू फील्ड व मे. युटीलिटी एंटरप्रायजेस यांचा दराचा लिफाफा उघडणेकरीता मा. आयुक्त सो. यांनी मान्यता दिलेली आहे.

निविदेचा तांत्रिक छाननी अहवाल संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेपासून कोणत्याही निविदाधारकाने हरकत नोंदविली नसल्याने पात्र निविदाधारकांचा दराचा लिफाफा दि. ०३/०२/२०२३ रोजी दुपारी १२:०० वाजता उघडण्यात आला.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि - १४, दि. २६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम ४५२ अ चा (१अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झालेले आहेत. करीता लघुत्तम निविदाधारक मे. न्यू फील्ड यांनी सादर केलेले दर बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने प्रशासकीय ठराव करून निविदाकार मे. न्यू फील्ड यांनी सादर केलेल्या दरांचे अवलोकन करणेकरीता प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. 04 दि. 03/04/2023**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आवश्यकतेनुसार विभागाकडे उपलब्ध असलेले सी. सी. टी. व्ही. व यंत्रणा कार्यान्वित करणे कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या १(अ) व १(ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि -१४, दि. २६/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून खालील प्रमाणे प्राप्त दरांचे अवलोकन करण्यात आले.

| अ. क्र. | तपशिल | निविदा धारकांचा तपशिल | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अंदाजपत्रकीय दर | मे. मिरॅकल इलेक्ट्रीकल सोल्यूशन्स इंडीया प्रा.लि. | मे. न्यू फील्ड | मे. रमेश इलेक्ट्रिकल | मे. युटीलिटी एंटरप्रायजेस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | Item No1<br>Camera installation charges per camera(MR) | रू. १६००/- | रू. १६००/- | रू. ११५०/- | रू. १९७०/- | रू. १८५०/- |
| ०२ | Item no.2<br>Supplying and installing cat-6 STP cable suitable for networking complete as per specification.. DSR 1-10-5 | रू. ९६/- | रू. ९६/- | रू. ८०/- | रू. १०४/- | रू. ९८/- |
| ०३ | Item no.3<br>Supplying and erecting mains with 3x2.5 sq.mm FRLSH copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole / Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW. DSR 1-3-6 | रू. ९३/- | रू. ९३/- | रू. ७८/- | रू. १०२/- | रू. ९५/- |
| ०४ | Item No. 4<br>Supplying and erecting HMS PVC conduit FRLS grade 25 mm dia. With necessary accessories in wall/floor with chiselling appropriately as per specification No: WG-MA/CC. DSR 1-1-9 | रू. १२७/- | रू. १२७/- | रू. ९९/- | रू. १३९/- | रू. ११३/- |
| | **Part B: Maintenance** | | | | | |
| ०५ | Comprehensive Maintenance for Second Year | -- | १०% | ९% | १४% | १२% |
| ०६ | Comprehensive Maintenance for Third Year | -- | १५% | १४% | २२% | १९% |
| ०७ | Comprehensive Maintenance for Fourth Year | -- | २०% | १९% | ३०% | २६% |
| | **शेरा** | | L-2 | L-1 | L-4 | L-3 |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. न्यू फील्ड यांनी सादर केलेले दर बाजारभावाशी तुलना केली असता वाजवी असल्याने प्राप्त दरांचे अवलोकन करण्यात आले.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // घनकचरा व्यवस्थापन //

## // गोषवारा // दि. 03/08/2023

**प्रकरण क्रमांक (04) :- M/S. Mars Planning And Engineering Services Pvt.Ltd यांना स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० DPR बनविणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणे व त्यांची तांत्रिक फि अदा करणेबाबत...**

केंद्र पुरस्कृत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणी करण्यासाठी कोकण विभाग M/S. IQVIA Consulting And Information Servirs India Pvt.Ltd.In Consortium with vision EIS Consulting Pvt.Ltd., M/S. Mars Planning And Engineering Services Pvt.Ltd यांना empalment order दि.२४/०२/२०२३ अन्वये कोकण विभागाकरीता नेमणुक केली. या पैकी या संस्थेने M/S. IQVIA Consulting And Information Servirs India Pvt.Ltd.In Consortium with vision EIS Consulting Pvt.Ltd. यांनी यापुर्वीच स्वच्छ नागरी अभियान २.० अभियाना अंतर्गत सादरीकरण केलेले आहे.

Maharashtra Urban Development Mission Directorate Swachh Bharat Mission यांनी दि.२४/०२/२०२३ रोजी नामिका सुची Empanelment Order मध्ये नमुद केल्यानुसार कोकण विभागाकरिता १० कोटि अदाजित रकमेच्या असलेल्या DPR करता सल्लागार फि प्रकल्प रक्कमेच्या २.१० टक्के आहे. याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| Estimate cost of the project INR in crores | Consulting Fees in % of Project Cost | Service Component wise Breakup of Consulting Fees(%) | | |
|---|---|---|---|---|
| | | Milestone १- Detailed+ Project Report | Milestone २- Transaction Advisory including Bid Process Management | Milestone ३- Supervision and Monitoring during Implementation(१२ Months) |
| १० | २.१०% | ०.८४% | ०.२१% | १.०५% |

M/S. Mars Planning And Engineering Services Pvt.Ltd या स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०(नागरी) करिता DPR बनविणे कामी यांची शासन आदेशानुसार नेमणुक करणेस व त्यांची तांत्रिक फी अदा करण्यास मान्यता मिळणे व सदर कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(रवि पवार)
उप-आयुक्त (घप्रवि)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

// घनकचरा व्यवस्थापन //

**प्रशासकिय ठराव दिनांक** 03 / 04 **/२०२३ रोजी** सायं ४.०० **वाजता**

**विषय क्रमांक - (** 05 **) मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज**

**M/S. Mars Planning And Engineering Services Pvt. Ltd यांना स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० DPR बनविणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणे व त्यांची तांत्रिक फि अदा करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...**

## कार्यालयीन प्रस्तावना

केंद्र पुरस्कृत स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत प्रकल्पांच्या अंमलबजावणी करण्यासाठी कोकण विभाग M/S. IQVIA Consulting And Information Servirs India Pvt.Ltd.In Consortium with vision EIS Consulting Pvt.Ltd., M/S. Mars Planning And Engineering Services Pvt.Ltd यांना empalment order दि.२४/०२/२०२३ अन्वये कोकण विभागाकरीता नेमणुक केली. या पैकी या संस्थेने M/S. IQVIA Consulting And Information Servirs India Pvt.Ltd.In Consortium with vision EIS Consulting Pvt.Ltd. यांनी यापुर्वीच स्वच्छ नागरी अभियान २.० अभियाना अंतर्गत सादरीकरण केलेले आहे.

Maharashtra Urban Development Mission Directorate Swachh Bharat Mission यांनी दि.२४/०२/२०२३ रोजी नामिका सुची Empanelment Order मध्ये नमुद केल्यानुसार कोकण विभागाकरिता ९० कोटि अदाजित रकमेच्या असलेल्या DPR करता सल्लागार फि प्रकल्प रक्कमेच्या २.१० टक्के आहे. याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| Estimate cost of the project INR in crores | Consulting Fees in % of Project Cost | Service Component wise Breakup of Consulting Fees(%) | | |
|---|---|---|---|---|
| | | Milestone १- Detailed+ Project Report | Milestone २- Transaction Advisory including Bid Process Management | Milestone ३- Supervision and Monitoring during Implementation( १२ Months) |
| ९० | २.१०% | ०.८४% | ०.२१% | १.०५% |

M/S. Mars Planning And Engineering Services Pvt.Ltd या स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०(नागरी) करिता DPR बनविणे कामी यांची शासन आदेशानुसार नेमणुक करणेस व त्यांची तांत्रिक फी अदा करण्यास मान्यता मिळणे व सदर कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.** 05 **दिनांक** 03/04/2023

M/S. Mars Planning And Engineering Services Pvt. Ltd यांना स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० DPR बनविणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी वे विशेषत: कलम ४५२(अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/ नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारनुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर

महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन M/S. Mars Planning And Engineering Services Pvt. Ltd यांना स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० DPR बनविणे कामी तांत्रिक सल्लागार नेमणुक करणेस व त्यांची तांत्रिक फी अदा करणे या कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत: घनकचरा प्रक्रिया प्रकल्प विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

F:\Ghankchra prakalpa vibhag\२०२२-२३\Ghankachra Praklpa Vibhag\८. MAHASABHA THARAV\१०..doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## परिवहन उपक्रम
### // गोषवारा // दि.03/04/2023

**प्रकरण क्र.06 :- मिरा भाईंदर महानगरपालिकाकेच्या परिवहन उपक्रमाकडील डिझेल 74 बसेस व 15 वित्त आयोगाअंतर्गत निधीतून खरेदी करावयाच्या 57 इलेक्ट्रीक बसकरीता तिकीट संकलन/पर्यवेक्षण, देखरेख इत्यादीसाठी एजन्सी नियुक्त करणेकामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजुरी देणेबाबत.**
**(Tender ID 2023_MBMC_ 875370_1)**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उक्त कामासाठी जाहिर निविदा सुचना, दै.इकोनॉमिक्स टाईम्स, दै.दि ग्लोबल टाईम्स व दै.जनादेश ठाणे या वृत्तपत्रांत दि.06/12/2022 रोजी प्रसिध्द करून e-tendering website वर Online निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरकामी दि.30/12/2022 पर्यंत निविदा सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. त्यानुसार Tender ID 2022_MBMC_ 857345_1 अन्वये सदरकामी दि.30/12/2022 रोजी पर्यंत एकही निविदा प्राप्त झालेली नव्हती. त्यामुळे सदरकामी दि.09/01/2023 पर्यंत प्रथम मुदतवाढ व दि.16/01/2023 पर्यंत **व्दितीय मुदतवाढ** देण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत दि.16/01/2023 रोजी पर्यंत **एकच निविदा** प्राप्त झाली होती.

सबब, सदरकामी दि.06/02/2023 रोजी फेर निविदा सुचना प्रसिध्द केली असता मुदतीत दि.15/02/2023 रोजी पर्यंत पुन:श्च **एकच निविदा** प्राप्त झाली होती. मुदतीत **एकच निविदा** प्राप्त असल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.17/02/2023 रोजी पुन्हा फेर निविदा सुचना प्रसिध्द केली असता मुदतीत दि.06/03/2022 रोजी पर्यंत **तीन निविदा** प्राप्त झाल्या आहेत.

सदर प्राप्त निविदांचे मा.आयुक्त यांच्या दि.06/03/2023 रोजीच्या मान्यतेने तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले असून निविदाधारक यांनी निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे तपासून नियुक्त सल्लागार M/s. J.K. Consultants (श्री.जयंत देशमुख) यांनी दि.16/03/2023 रोजी Technical Evaluation Report सादर केलेला आहे. त्यानुसार त्यांनी Unity Security Force and Training Institute व Vansh Infotech Private Limited हे निविदाधारक पात्र व Kishor Agencies हे निविदाधारक अपात्र होत असल्याचे नमुद केले असुन पात्र निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेस मा. निविदा समितीने दि.20/03/2023 रोजी शिफारस केली असून, मा. आयुक्त यांनी दि.21/03/2023 रोजी मंजूरी दिली आहे.

उक्तप्रमाणे पात्र 02 निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) दि.23/03/2023 रोजी उघडण्यात आले असून निविदेतील दर पुढीलप्रमाणे आहेत. सदर निविदेमधील प्राप्त दरांचे Financial

Evaluation करून सल्लागार M/s. J.K. Consultants (श्री.जयंत देशमुख) यांनी दि.24/03/2023 रोजी अहवाल सादर केला असून निविदेतील M/s. Vansh Infotech Private Limited यांचे दर वाजवी असल्याने स्विकारणेस शिफारस केली आहे. तसेच, सदर दर वाटाघाटीसाठी M/s. Vansh Infotech Private Limited यांना दि.28/03/2023 रोजी निविदा समिती समक्ष बोलाविले असता, आणखी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे.

| Sr. | Parameters | Qty | Estimated Ridership | Total rates exclusive of GST | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Unity Security Force and Training Institute | Vansh Infotech Private Limited |
| 1 | **Total Staff Cost (Staff as per Annexure-12)** | 364 | - | 9922398.00 | **9922398.00** |
| 2 | **The Management Fee and other Overheads (Refer point no.(10) for other overheads** | 1 | - | 1776109.20 | **1458592.50** |
| 3 | **Total** | 1 | - | 11698507.20 | **11380990.50** |
| 4 | **Expected Ridership for 123 buses per Month** | 1 | 3400000 | | |
| 5 | **Reimbursement of Fare collection cost per passenger** | 1 | - | 3.44 | **3.35** |
| 6 | **Reimbursement of Fare collection cost per passenger In words** | | | Three rupees forty four paise only | **Three rupees Thirty five paise only** |
| | | | | L2 | L1 |

वरीलप्रमाणे M/s.Vansh Infotech Private Limited यांनी निविदेमध्ये सादर केलेले दर सर्वात कमी असून दर वाजवी असल्याने त्यांची निविदा स्विकारणेसाठी मा. निविदा समितीने शिफारस केली असुन दि.31/03/2023 रोजी मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

तरी, उक्तप्रमाणे M/s.Vansh Infotech Private Limited यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस व करारनामा करून कार्यादेश देणेस मंजूरीस शिफारस आहे.

गोषवारा प्राप्त दि. 03/4/2023 वेळ स.11 वा.
प्रशासकीय पत्र
रजिस्टर अ. क्र. 340 09 वर्ष 2022/23
03/4/2023
निर्णय
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(अनिकेत मानोरकर)
अति.आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## परिवहन उपक्रम

### प्रशासकीय ठराव दि.03/04/2023

**प्रकरण क्र. 08 :- मिरा भाईंदर महानगरपालिकाकेच्या परिवहन उपक्रमाकडील डिझेल 74 बसेस व 15 वित्त आयोगाअंतर्गत निधीतून खरेदी करावयाच्या 57 इलेक्ट्रीक बसकरीता तिकीट संकलन/पर्यवेक्षण, देखरेख इत्यादीसाठी एजन्सी नियुक्त करणेकामी प्राप्त निविदा स्विकारणेस मंजुरी देणेबाबत.**

**(Tender ID 2023_MBMC_ 875370_1)**

**ठराव** 08 :-

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या उक्त कामासाठी जाहिर निविदा सुचना, दै.इकोनॉमिक्स टाईम्स, दै.दि ग्लोबल टाईम्स व दै.जनादेश ठाणे या वृत्तपत्रांत दि.06/12/2022 रोजी प्रसिध्द करून e-tendering website वर Online निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरकामी दि.30/12/2022 पर्यंत निविदा सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. त्यानुसार Tender ID 2022_MBMC_ 857345_1 अन्वये सदरकामी दि.30/12/2022 रोजी पर्यंत एकही निविदा प्राप्त झालेली नव्हती. त्यामुळे सदरकामी दि.09/01/2023 पर्यंत प्रथम मुदतवाढ व दि.16/01/2023 पर्यंत **व्दितीय मुदतवाढ** देण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत दि.16/01/2023 रोजी पर्यंत **एकच निविदा** प्राप्त झाली होती.

सबब, सदरकामी दि.06/02/2023 रोजी फेर निविदा सुचना प्रसिध्द केली असता मुदतीत दि.15/02/2023 रोजी पर्यंत पुन:श्च **एकच निविदा** प्राप्त झाली होती. मुदतीत **एकच निविदा** प्राप्त असल्याने स्पर्धात्मक दर प्राप्त होण्यासाठी दि.17/02/2023 रोजी पुन्हा फेर निविदा सुचना प्रसिध्द केली असता मुदतीत दि.06/03/2022 रोजी पर्यंत **तीन निविदा** प्राप्त झाल्या आहेत.

सदर प्राप्त निविदांचे मा.आयुक्त यांच्या दि.06/03/2023 रोजीच्या मान्यतेने तांत्रिक लिफाफे उघडण्यात आले असून निविदाधारक यांनी निविदेसोबत सादर केलेली कागदपत्रे तपासून नियुक्त सल्लागार M/s. J.K. Consultants (श्री.जयंत देशमुख) यांनी दि.16/03/2023 रोजी Technical Evaluation Report सादर केलेला आहे. त्यानुसार त्यांनी Unity Security Force and Training Institute व Vansh Infotech Private Limited हे निविदाधारक पात्र व Kishor Agencies हे निविदाधारक अपात्र होत असल्याचे नमुद केले असुन पात्र निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) उघडणेस मा. निविदा समितीने दि.20/03/2023 रोजी शिफारस केली असून, मा. आयुक्त यांनी दि.21/03/2023 रोजी मंजूरी दिली आहे.

उक्तप्रमाणे पात्र 02 निविदाधारक यांचे दराचे लिफाफे (Financial Bid) दि.23/03/2023 रोजी उघडण्यात आले असून निविदेतील दर पुढीलप्रमाणे आहेत. सदर निविदेमधील प्राप्त दरांचे Financial

Evaluation करून सल्लागार M/s. J.K. Consultants (श्री.जयंत देशमुख) यांनी दि.24/03/2023 रोजी अहवाल सादर केला असून निविदेतील M/s. Vansh Infotech Private Limited यांचे दर वाजवी असल्याने स्विकारणेस शिफारस केली आहे. तसेच, सदर दर वाटाघाटीसाठी M/s. Vansh Infotech Private Limited यांना दि.28/03/2023 रोजो निविदा समिती समक्ष बोलाविले असता, आणखी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली आहे.

| Sr. | Parameters | Qty | Estimated Ridership | Total rates exclusive of GST | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Unity Security Force and Training Institute | Vansh Infotech Private Limited |
| 1 | Total Staff Cost (Staff as per Annexure-12) | 364 | - | 9922398.00 | 9922398.00 |
| 2 | The Management Fee and other Overheads (Refer point no.(10) for other overheads | 1 | - | 1776109.20 | 1458592.50 |
| 3 | Total | 1 | - | 11698507.20 | 11380990.50 |
| 4 | Expected Ridership for 123 buses per Month | 1 | 3400000 | | |
| 5 | Reimbursement of Fare collection cost per passenger | 1 | - | 3.44 | 3.35 |
| 6 | Reimbursement of Fare collection cost per passenger In words | | | Three rupees forty four paise only | Three rupees Thirty five paise only |
| . | | | | L2 | L1 |

वरीलप्रमाणे M/s.Vansh Infotech Private Limited यांनी निविदेमध्ये सादर केलेले दर सर्वात कमी असून दर वाजवी असल्याने त्यांची निविदा स्विकारणेसाठी मा. निविदा समितीने शिफारस केली असुन दि.31/03/2023 रोजी मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे.

तरी, उक्तप्रमाणे M/s.Vansh Infotech Private Limited यांची सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेस व करारनामा करून कार्यादेश देणेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार परिवहन विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\२०२२-२३\Fare Collection\Re-tender -२\goshwara\Tharav.docx